**सं.फौ.ख.क्र. ७६३/२०२४**
**निशाणी क्र. १८**

**अभियोग पक्षातर्फे सा. क्र. १ यांचा सरतपास शपथेवर.**

**नाव:** सुरेश गौतम भरणे
**वय:** ५७ वर्षे, **व्यवसाय:** शेती,
**पत्ता:** मौजे भरणेवाडी, ता. इंदापूर जि. पुणे.

**सरतपास सहाय्यक सरकारी वकील श्रीमती एन. पी. कुचेकर यांचे मार्फत सुरु**

दिनांक ०३/०४/२०२३ रोजी मी माझ्या राहत्या घरी भरणेवाडी येथे होतो. त्यानंतर सकाळी ८:३० वाजताच्या दरम्यान आम्हाला बाळू सिताराम गावडे यांचा फोन आला की, माझे मेव्हूणे नामे मारूती धायतोंडे यांचा जंक्शन—कळसरोडवर अपघात झालेला आहे. त्यानंतर आम्हाला असे समजले की, धायतोंडे यांना जंक्शन येथील दवाखान्यात दाखल केले आहे. त्यानंतर मी, माझे चुलत बंधू दादा भरणे असे आम्ही दवाखान्यात गेलो. आम्ही दवाखान्यात पोहचणेपूर्वी डॉक्टरांनी धायतोंडे हे मयत असल्याचे घोषित केले होते. त्यांचा अपघात चारचाकी टेम्पोमुळे झालेला होता. त्यानंतर आम्ही पोलीस स्टेशनला जाऊन फिर्याद दिली. आता मला माझा फिर्यादी जबाब दाखविण्यात आला. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यावर माझी सही आहे. त्यास **निशाणी क्र. १९** देण्यात येते.

**२.** सदरचे चारचाकी वाहन कोण चालवित होते याबाबत आम्हाला समजले नाही.

सरतपास पूर्ण.

**उलटतपास आरोपीचे वकील श्री. आर. आर. बनसोडे यांचे मार्फत शपथेवर**

**३.** दवाखान्यात माझा चुलत भाऊ गेला होता, मी गेलो नव्हातो. हे म्हणणे खरे नाही की, जंक्शन—भरणेवाडी हे अंतर एक—दीड किमी आहे. हे म्हणणे खरे आहे की, माझे जंक्शन चौकात रोजचे येणे—जाणे आहे. माझी जंक्शन पोलीसांशी ओळख नाही. मी संतोष शिंगाडे यांना ओळखतो. ते कडबनवाडीचे पोलीस पाटील आहेत. माझे त्यांचेसोबत चांगले संबंध आहेत. हे म्हणणे खरे आहे की, ज्या ठिकाणी घटना घडली होती त्या ठिकाणी त्या दिवशी गेलो नव्हतो.

**सं.फौ.ख.क्र. ७६३/२०२४**
**निशाणी क्र. १८**

**४.** फिर्याद दिनांक ०३/०४/२०२३ रोजी दिली होती. हे म्हणणे खरे आहे की, मी फिर्याद दिल्यानंतर पोलीसांनी मला चौकशीला बोलाविले नव्हते. हे म्हणणे खरे आहे की, मी स्वत:हून पुन्हा पोलीस स्टेशनला गेलो नव्हतो. हे म्हणणे खरे नाही की, या आरोपीची गाडी नसताना माझे आणि पोलीस पाटील शिंगाडे यांचे पोलीसांकडे जाणे–येणे असल्याने खोटी केस केली आहे. हे मला सांगता येणार नाही की, या आरोपीची गाडी नव्हती किंवा कसे.

**५.** हे म्हणणे खरे नाही की, माझ्या सरतपासातील संपूर्ण मजकूर खोटा आहे.

उलटतपास पूर्ण.
फेरतपास नाही.

माझे समक्ष व श्रवणोत्तर स्विकृत,

Digitally signed by JYOTI NITIN BHASME
Date: 2025.02.13 16:49:25 +0530

ठिकाण इंदापूर (जे.एन.भस्मे)
दिनांक १३/०२/२०२५ प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, इंदापूर.